Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,
१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./परीक्षा-२/3098
पुणे-४११००४
दिनांक-२४/०६/२०२२

प्रती,

विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व विभागीय मंडळे,

विषय:-आय.टी.आय.च्या विद्यार्थ्यांचा निकाल तयार करणेसंदर्भात.
संदर्भ:-१)नाशिक विभागीय मंडळाचे पत्र क्र.माविमं/उमा अ २/५६२-दिनांक १२/५/२०२२
२)मेजर आनंदराव घाटगे अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, व्हनाळी ता.कागल, जि.कोल्हापूर यांचे पत्र क्र. MAGITCV/113/2022 दिनांक ९/६/२०२२
३) श्री लक्ष्मीनारायण औद्योगिक प्रशिक्षण संस्था श्री शिवाजीनगर, ता.राहुरी, जि.अहमदनगर यांचे पत्र क्र.एस.एल.एन./२०२२/११९ दिनांक १४/६/२०२२

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रांस अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या व औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) मधील व्यवसाय विषय घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना इ.१० वी व इ.१२ वी समकक्षता देण्यासाठी दिनांक २७ सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.५ व ९ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

तसेच सदर विद्यार्थ्यांचा निकाल तयार करताना मंडळाच्या निकषानुसार विद्यार्थ्यास प्रत्येक विषयात किमान ३५ गुण मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस औद्योगिक प्रशिक्षण संस्थामार्फत प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत आय.टी.आय. च्या विषयांच्या उत्तीर्णतेच्या निकषानुसार मंडळामार्फत निकाल तयार करण्यासाठी संबंधित I.T.I. संस्थेने ३३ किंवा ३४ गुणांची उत्तीर्णता असलेल्या विषयाचे रुपांतर ३५ गुणात करून कळविणे आवश्यक आहे. सदर संस्थांकडून याप्रमाणे आय.टी.आय. च्या विषयांची संपादणूक मागवून घेण्यात यावी.

उपरोक्त बाब विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत येणाऱ्या जिल्ह्यांमधील शासकीय व अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना(आय.टी.आय.) कळविण्यात यावी. व आय.टी.आय.च्या विद्यार्थ्यांची संपादणूक प्राप्त झाल्यानंतर इ.१० वी व इ.१२ वी च्या विद्यार्थ्यांचा सुधारित निकाल तयार करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

डॉ.अशोक भोसले,
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४

क/नाविमं/उमा/अ—१/2098
नाशिक—४२२००३
दिनांक २९/०६/२०२२
11/07/2022

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुबार.

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, राज्यमंडळाचे वरील पत्रानुसार नोंद घेवून पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. सदरची बाब सर्व शिक्षक, संबंधितांच्या निदर्शनास आणून दयावी.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक